
नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS
संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २७८ Issue - 278 | वार सोमवार दि. २४ फेब्रुवारी २०२५ Blow- Monday Date 24 February 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

थोडक्यात...



## राज्यपालांचे संत गाडगे बाबा यांना अभिवादन

मुंबई : संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज रविवारीराजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे परिवार प्रबंधक जितेंद्र वाघ, राजभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पाकिस्तानची लाज काढत भारताने विजयासह सेमी फायनल गाठली

### कोहलीची 'विराट' खेळी ठरली गेमचेंजर; भारताचा पाकिस्तानवर दणदणीत विजय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुबई : भारताने पाकिस्तानची जगासम ोर लाज काढत दणदणीत विजयाची नोंद केली. अचूक गोलंदाजी आणि धडाकेबाज फटकेबाजीच्या जोरावर भारताने पाकिस्तानला धुळ चारली आणि उपांत्य फ ेरीत प्रवेश जवळपास निश्चित केला आहे. विराट कोहलीच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताला या महत्वाच्या लढतीत विजय साकारता आला. भारताच्या गोलंदाजांनी पाकिस्तानला २४१ धावांत रोखले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने चांगली दमदार सुरुवात केली. दोन्ही सलाम ीवीर बाद झाल्यावर विराट कोहलीने अप्रतिम फलंदाजीचा नजराणा पेश करत भारताला सहा विकेट्स राखून विजय मिळवून दिला. भारताचा चॅम्पियन्स ट्रॉफीम धील हा सलग दुसरा विजय ठरला आहे. विराट कोहलीने या सामन्यात नाबाद १०० धावांची खेळी साकारली आणि भारताच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला.



रोहित शर्मांने या सामन्यात २० धावांची खेळी साकारली. पण या २० धावा करताना रोहितने वर्ल्ड रेकॉर्ड रचला. वनडे क्रिकेटमध्ये ९००० धावा करणारा रोहित हा जगातील पहिलाच फलंदाज ठरला आहे.

शुभमन गिलने एकाच षटकात खणखणीत तीन चौकार लगावत शाहीन आफ्रिदीची जोरदार धुलाई केली. गिल अर्धशतक झळकावण्यासाठी सज्ज झाला होता. पण खुशदिलने त्याला बाद केले, गिलचे अर्धशतक यावेळी ४ धावांनी हुकले. पण गिलने सात चौकारांच्या जोरावर ४६ धावा केल्या.

विराट कोहलीने दमदार खेळी साकारत यावेळी वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला. विराट कोहलीने या सामन्यात सर्वात जलद आंतरराष्ट्रीय वनडे क्रिकेटमध्ये १४ हजार धावांचा पल्ला गाठला. विराट कोहलीची या सामन्यातील खेळी भारतासाठी गेमचेंजर ठरली.

विराट कोहली आणि श्रेयस अय्यर यांची चांगलीच जोडी या सामन्यात जमली. शुभमन गिल बाद झाला तेव्हा भारताची २ बाद १०० अशी स्थिती होती. त्यानंतर विराट आणि श्रेयस यांनी धडाकेबाज फटकेबाजी करत शतकी भागीदारी रचली व भारताचा विजय सुकर केला. श्रेयस अय्यर यावेळी ५६ धावांवर बाद झाला.

भारताच्या गोलंदाजांनी या सामन्यात कमाल केली. पाकिस्तानने सुरुवात चांगली केली होती. पण भारताने एकदा विकेट्स मिळवायला सुरुवात केली आणि सातत्याने त्यांनी पाकिस्तानला धक्के दिले. त्यामुळेच भारताला पाकिस्तानला २४१ धावांत रा-ेखता आले. भारताकडून सर्वाधिक तीन विकेट्स कुलदीप यादवने घेतल्या, तर हार्दिकने त्याला दोन बळी मिळवत सुरेख साथ दिली.

भारताचा हा चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील सलग दुसरा विजय ठरला. यापूर्वी भारताने पहिल्या सामन्यात बांगलादेशला पराभूत केले होते. आता भारताचा पुढचा सामना हा न्यूझीलंडबरोबर २ मार्चला होणार आहे.

## दिल्ली विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्यापदी आतिशी यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : दिल्लीच्या मुख्यमंत्री पदी रेखा गुप्ता यांची निवड झाल्यानंतर आता आपने विरोधी पक्षनेताही जाहीर केला आहे. दिल्लीच्या माजी काळजीवाहू मुख्यमंत्री आतिशी आता दिल्लीच्या विधानसभेतील विरोधी पक्षनेत्या असतील. त्यामुळे या निमित्त-ाने दिल्लीत महिला विरुद्ध महिला असा सामना पाहायला मिळणार आहे.

दिल्लीत आम आदमी पक्षाला पराभव पत्कारावा लागल्यानंतर भाजपाने सत्ता स्थापन केली. मुख्यमंत्री पदासाठी रेखा गुप्ता यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं असून २५ फेब्रुवारी रोजी सर्व आमदार पदा-ची शपथ घेणार आहेत. याच पार्श्वभूमीवर आपच्या नेत्यांनी आतिशी यांची विरोधी पक्षनेते म्हणून निवड केली. आज दुपारी १ वाजता आमदार आणि वरिष्ठ नेत्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांसह आणि त्यांच्या आघाडीच्या संघटनांच्या प्रभारींबरोबर बैठक घेतली. या बैठकीत निवडणुकीदरम्यान त्यांच्या भूमिकांचे मूल्यांकन करण्यासाठी लोकसभा, जिल्हा, विधानसभा आणि वॉर्ड पातळीवरील सर्व कार्यकर्त्यांचे ऑडिट जाहीर करण्याचे आवाहन करण्यात आले.

नवनिर्वाचित विधानसभेचे सदस्य (आमदार) २५ फेब्रुवारी रोजी शपथ घेतील, तर १४ प्रलंबित कॅग अहवाल दुसऱ्या दिवशी मांडले जातील. मागील आप सरकारच्या कार्यकाळापासून प्रलंबित असलेले कॅग अहवाल सादर करण्यास मान्यता रेखा गुप्ता यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिली. गुप्ता यांनी शनिवारी राष्ट्रीय राजधानीच्या आगामी अर्थसंकल्पावरील बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविले. यामध्ये सर्व कॅबिनेट मंत्री आणि विभाग प्रमुख उप-स्थित होते. निवडणूक निकालानंतर माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची त्यांच्या निवासस्थानी पक्षाच्या विजयी उमेदवारांनी भेट घेतली. यावेळी केजरीवाल यांनी त्यांना लोकांसाठी काम करण्याचा आणि त्यांच्या समस्या सोडवण्याचा सल्ला दिला. पक्ष रचनात्मक विरोधक म्हणून काम करेल असे आतिशी यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी सांगितले.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठी महाराष्ट्राचे शिष्टमंडळ पॅरिसला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

### सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार याच्या नेतृत्वात शिष्टमंडळ रवाना

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्लयांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळविण्यासाठी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ आज पॅरिसला गेले आहे.

महाराष्ट्र शासनाने ङ्गमराठा लष्करी भूप्रदेशफ (चरीींहर चळश्रळींरू डरपवीलरशि ेष खपवळर) या संकल्पनेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्लयांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. या किल्लयांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. याबाबतचे सादरीकरण पूर्ण क्षमतेने प्रभावीपणे करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार हे शिष्टमंडळ गेले आहे.

छत्रपती शिवाजी महार-ाज यांच्या गड किल्लयांचा राज्य शासनाचा प्रस्ताव प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युनेस्कोकडे पाठवला, त्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे व सादरीकरणासाठी जाण्याची संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही मंत्री ड.शेलार यांनी आभार मानले आहेत.

या प्रस्तावाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यांचे शिष्टमंडळ २२ ते २६ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत पॅरिस, फ्रान्स येथे गेले आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.शेलार करणार आहेत. इतर सदस्यांमध्ये अपर मुख्य सचिव विकास खारगे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी आणि वास्तुविशारद शिखा जैन यांचा समावेश आहे.

या शिष्टमंडळाच्या पॅरिस दौऱ्याद्वारे, या किल्लयांना जागतिक वारसा दर्जा मिळविण्यासाठी आवश्यक तांत्रिक आणि राजनैतिक सादरीकरण करण्यात येईल. यामुळे छत्रपती शिवाजी म हाराजांच्या गड-किल्लयांना जागतिक स्तरावर आ-ेळख मिळण्यास मदत होईल. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाल्यास, या किल्लयांचे जतन, संवर्धन आणि पर्यटन विकासासाठी अधिक संधी उपलब्ध होतील. ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारशाचे महत्व आणि जतन सुनिश्चित होईल, अशी आशा ड.आशिष शेलार यांनी व्यक्त केली आहे.

## महाकुंभमेळ्यातील भाविकांसाठी मध्य, पश्चिम रेल्वेवरुन विशेष रेल्वेगाड्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महाकुंभमेळ्याला जाणाऱ्या यात्रेकरूंचा प्रवास सुकर होण्यात भारतीय रेल्वे महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कुंभम ेळ्याला जाणाऱ्या भाविकांची प्रचंड गर्दी लक्षात घेऊन, पश्चिम रेल्वे मुंबई सेंट्रल, वापी, वल-साड, उधना, वडोदरा, विश्वामित्री, अहमदाबाद, साबरमती, भावन-गर, राजकोट, इंदूर या पश्चिम रेल्वेच्या विविध स्थानकांवरून १२५ विशेष गाड्या चालवत आहे. तर, मध्य रेल्वेवरील मुंबई विभागातून ८२३ रेल्वेगाड्या चालवण्यात आल्या. यामध्ये लोकम ान्य टिळक टर्मिनस येथून ७०८ आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ११५ रेल्वेगाड्या चालवण्यात आल्या.

कुंभमेळ्याला देशभरातून लाखो नागरिक जात आहेत कुंभमेळ्यासाठीच्या विशेष गाड्या प्रयागराज तसेच जवळच्या इतर रेल्वे स्थानकांसाठी चालवल्या जात आहेत. त्याचा फायदा घेऊन हजारो भाविक कुंभमेळ्यात पोहोचत आहेत. पश्चिम रेल्वेने या कुंभ विशेष रेल्वेगाड्यांद्वारे १.६५ लाखांहून अधिक यात्रेकरूंना त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचवले आहे.

कुंभ विशेष गाड्यांच्या २६ फेऱ्या मुंबई मध्यवर्ती विभागातून, २४ फेऱ्या अहमदाबाद विभागातून, ८ फेऱ्या भावनगर विभागातून, ४ फेऱ्या राजकोट विभागातून, २ फेऱ्या वडोदरा विभागातून आणि ६ फेऱ्या रतलाम विभागातून चालवल्या जात आहेत. कुंभमेळ्याला ये-जा करणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित आणि आराम दायी व्हावा यासाठी रेल्वे प्रशासन अथक प्रयत्न करत आहे, असे पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी सांगितले. मध्य रेल्वेने महाकुंभ २०२५ साठी विविध स्थानकांवर ६,५०० हून अधिक रेल्वेगाड्यांच्या थांब्यांसह भाविकांना सुविधा दिली. ८ जानेवारीपासून लोकम ान्य टिळक टर्मिनस येथून नियमित आणि विशेष रेल्वेसह ७०८ रेल्वेगाड्या आणि सीएसएमटीवरून ११५ रेल्वेगाड्या चालवण्यात आल्या. मुंबई व्यतिरिक्त पुणे विभागातून ६ विशेष गाड्यांसह १०२ रेल्वेगाड्या फेऱ्या, नागपूर स्थानकावर ६ विशेष रेल्वेगाड्यांसह २२५ रेल्वेगाड्या सेवा चालवून हजारो भाविकांची सोय करण्यात महत्त्व-पूर्ण योगदान दिले आहे, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली.

मध्य रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवरून जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्यांमध्ये भाविकांची लक्षणीय गर्दी दिसून आली. त्यामुळे प्रमुख स्थानकांवर थांबे देण्यात आले. ठाणे रेल्वे स्थानकात ३८३ रेल्वेगाड्यांना थांबे दिले. कल्याण रेल्वे स्थानकात ६८७ रेल्वेगाड्यांना, भुसावळ रेल्वे स्थानकात ७२३ रेल्वेगाड्यांना, नाशिक रेल्वे स्थानकात ६०१ रेल्वेगाड्यांचे, मनमाड रेल्वे स्थानकात ५३७ रेल्वेगाड्यांना, बैतूल रेल्वे स्थानकात १३८ रेल्वेगाड्यांना थांबे देण्यात आले.

**प्रचंड वाहतूकीची कोंडी**

**भाविक महाकुंभ परिसरात पोहोचण्यासाठी १०-१५ किलोमीटर करताहेत पायपीट**

## महाकुंभमेळ्याच्या समाप्तीपूर्वी प्रयागराजमध्ये भाविकांची तोबा गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभम ेळा येत्या २६ फेब्रुवारी रोजी समाप्त होणार आहे. या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात भाविकांनी त्रिवेणी संगम येथे पवित्र स्नान करण्यासाठी गर्दी करण्यास सुरुवात केला आहे. यामुळे प्रयागराज शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचा प्रकार समोर आला आहे.



२२ फेब्रुवारी रोजी कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांच्या संख्येने ६० कोटींचा टप्पा ओलंडला आहे. कुंभमेळ्याला काही दिवस शिल्लक राहिले असल्याने महाशिवरात्रीच्या आधी मोठ्या प्रमाणावर भाविक प्रयागराज येथे दाखल होत आहेत.

मीडिया रिपोर्ट्सनुसार १३ जानेव-ारी रोजी सुरूवात झालेल्या कुंभमेळ्यात दररोज एक कोटींहून अधिक भाविक प्रयागराज येथील कुंभमेळ्याला हजेरी लावत आहेत. यामुळे प्रयागराज आणि परिसरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे.

प्रयागराज येथील वाहतूक कोंडीचे काही व्हिडीओ समोर आले आ-हेत. ज्यामध्ये वेगवेगळ्या राज्यामधून आलेल्या चारचाकी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे दिसून येत आ-हेत. पोलिसांकडून गर्दीचे नियोजन करण्यासाठी तसेच वाहानांच्या पार्किंगची सोय करण्यासाठी प्रयत्न सुरू आ-हेत. महाकुंभ परिसरात जाणाऱ्या शटल बसेसमध्ये यात्रेकरूंची प्रचंड गर्दी झाल्याने अनेक भाविकांना महाकुंभ परिसरात पोहोचण्यासाठी १०-१५ किलोमीटर चालावे लागले.

महाकुंभमेळ्याचे उपमहानिरीक्षक वैभव कृष्णा यांनी पीटीआयला सांगितले की, गर्दी नियंत्रणासाठी पोलिसांनी अतिरिक्त पोलिस दल तैनात केले आहे.

महाकुंभमेळ्याच्या शेवटच्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात गर्दी वाढण्याच्या अपेक्षेने पोलिसांनी रेल्वे स्थानकांभोवती सतर्कता वाढवली आहे. १३ जानेवारीप-ासून या महाकुंभ मेळ्यासाठी जवळपास १३,६६७ गाड्या चालवण्यात आल्या आहेत.

नवी दिल्ली येथे रेल्वे स्थानकावरील झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकाडून काळजी घेतली जात आहे. अयोध्या धाम रेल्वे स्थानकावर बॅरिकेड्स आणि होल्डिंग एरिया तयार करण्यात आला असल्याची माहिती डीएसपी यशवंत सिंह यांनी एए-नआय या वृत्तसंस्थेशी बोलताना दिली. दरम्यान प्रयागराजमधील महाकुंभात पवित्र स्नान केल्यानंतर अनेक भाविकांनी राम मंदिराचे दर्शन घेण्यासाठी अयोध्येला जात आहेत. दोन्ही शहरांमध्ये फक्त १६० किलोमीटरचे अंतर असल्याने भाविक तेथे जात आहेत.


## संपादकीय....

# दणदणीत विजय

भारताने पाकिस्तानची जगासमोर लाज काढत दणदणीत विजयाची नोंद केली. अचूक गोलंदाजी आणि धडाकेबाज फटकेबाजीच्या जोरावर भारताने पाकिस्तानला धुळ चारली आणि उपांत्य फेरीत प्रवेश जवळपास निश्चित केला आहे. विराट कोहलीच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताला या महत्वाच्या लढतीत विजय साकारता आला. भारताच्या गोलंदाजांनी पाकिस्तानला २४१ धावांत रोखले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने चांगली दमदार सुरुवात केली. दोन्ही सलामीवीर बाद झाल्यावर विराट कोहलीने अप्रतिम फलंदाजीचा नजराणा पेश करत भारताला सहा विकेट्स राखून विजय मिळवून दिला. भारताचा चॅम्पियन्स ट्रॉफीमधील हा सलग दुसरा विजय ठरला आहे. विराट कोहलीने या सामन्यात नाबाद १०० धावांची खेळी साकारली आणि भारताच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. भारताच्या गोलंदाजांनी या सामन्यात कमाल केली. पाकिस्तानने सुरुवात चांगली केली होती. पण भारताने एकदा विकेट्स मिळवायला सुरुवात केली आणि सातत्याने त्यांनी पाकिस्तानला धक्के दिले. त्यामुळेच भारताला पाकिस्तानला २४१ धावांत रोखता आले. भारताकडून सर्वाधिक तीन विकेट्स कुलदीप यादवने घेतल्या, तर हार्दिकने त्याला दोन बळी मिळवत सुरेख साथ दिली. भारताचा हा चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील सलग दुसरा विजय ठरला. यापूर्वी भारताने पहिल्या सामन्यात बांगलादेशला पराभूत केले होते. आता भारताचा पुढचा सामना हा न्यूझीलंडबरोबर २ मार्चला होणार आहे.




# १५०० वर्षांचा इतिहास जपणारी मराठी भाषा अमृताहूनी गोड...!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मराठी भाषेचा उगम उत्तरेकडे झाला. मराठी भाषा मूळ आर्यांची भाषा आहे. जवळजवळ १५०० वर्षांचा इतिहास जपणारी मराठी भाषा आहे. उत्तरेकडील सातपुडा पर्वत रांगापासून ते कावेरीच्या पश्चिमेकडील प्रांतापर्यंत, उत्तरेस दमणपासून दक्षिणेकडे गोव्यापर्यंत मराठीचा विस्तार झाला. प्रामुख्याने भारताच्या दक्षिण भागात मराठी भाषा विकसित झाली. येथील सह्याद्री, सातपुडासारख्या डोंगररांगा, गड व किल्ले, दर्याखोर्यांचा परिसर म्हणजेच महाराष्ट्र भूमी. या भूमीपेक्षाही अधिक राकट, कणखर असा मराठी माणूस निर्माण झाला आहे. म्हणूनच १५०० वर्षांचा इतिहास जपणारी मराठी भाषा अमृताहूनी गोड...! नाकारणे अशक्य वाटते.

इ. सन ५००-७०० वर्षांपासून पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, पाली, प्राकृत, अपभ्रंश या टप्प्यातून उत्क्रांत होत होत मराठी भाषेतील पहिले वाक्य श्रवणबेळगोळ येथील शिलालेखावर सापडले. मुकुंदराज व ज्ञानेश्र्वर हे सर्वमान्य आद्य मराठी कवी मराठीची वैशिष्ट्ये तिच्या सामर्थ्यासह मांडताना दिसतात. ११९० मधील मुकुंदराजांनी रचलेला विवेकसिंधु हा ग्रंथ मराठी भाषेतील पहिला ग्रंथ आहे. ज्ञानेश्र्वरांनी 'परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरेचि रसिके मेळविन।' अशा शब्दात मराठी भाषेचा गोडवा अमृतापेक्षाही जास्त आहे असे म्हटले आहे. भगवद्गीता सर्वसामान्यांना समजावी, यासाठी ज्ञानेश्र्वरी वा भावार्थ दीपिका या ग्रंथाचे लेखन मराठीत केले. त्याचप्रमाणे श्री चक्रधर स्वामींनी लिहिलेले लीळाचरित्र म्हणजे मराठीतील पहिला मराठी पद्य चरित्रग्रंथ होय. तेव्हापासून पद्यलेखनाची परंपरा सुरू झाली.

महानुभावपंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामींनी लिहिलेल्या ग्रंथातील दृष्टांतावरून मराठीची गतिमानता, सहजसौंदर्य, नादमाधुर्य, गोडवा दिसून येतो. संत एकनाथांनी 'भागवत' ग्रंथाची रचना करून मराठीत भर घातली. यातील बोलीभाषेशी जवळीक साधणारा शब्दसंग्रह, छोटी छोटी लयबद्ध वाक्यामुळे मराठी भाषा आजच्या वाचकालाही तितकीच आपलीशी वाटते.

कालानुक्रमे मराठीच्या उगमापासून ते सध्याच्या मराठीच्या स्वरूपात अनेक बदल झालेले दिसतात. या बदलाचे एक कारण म्हणजे मराठी मातीत राज्य केलेल निरनिराळ्या सत्ता होय. शिवछत्रपतींच्या काळात फारशी भाषेचा प्रभाव मराठीवर झालेला दिसून येतो. त्या काळात राजकीय पत्रव्यव्हार, बखरी लिहिणसाठी मराठीचा वापर केलेला दिसून येतो. या पत्रांचा समावेश 'मराठी रुमाल' किंवा 'पेशव दफ्तर' या सारख्या संग्रहातून करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'आज्ञापत्रात' मराठी भाषेची बदललेली शैली दिसून येते. तसेच यावरून तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थितीचा प्रभाव भाषेवर पडत असतो, हे सिद्ध होते.

मराठी भाषेवर संस्कृतचे वर्चस्व प्रस्थापित झालेले दिसते. या कालखंडात संस्कृत काव्याचे अनुकरण करणारी पंडिती कविता लिहिल्या गेल्या. यातील कथाभाग, अलंकारिकता, अभिजात भाषावैभव या विशेषामुळे कवितेने मराठीला समृद्ध केले आहे. यानंतरच्या काळात लोकजीवनाशी व लोककलांशी जवळीक साधणारी शाहिरी कविता आकाराला आली. भक्तीपासून ते शृंगारापर्यंतचे अनेक अनुभव खास मराठमोळ्या शैलीत साकार करणार्या शाहिरांच्या कविता हे मराठी कवितेचे एक भूषण आहे. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे पोवाडा हा प्रकार होय.



– मुन्नाभाई नंदागवळी,
येरंडी-बाराभाटी, त. अर्जुनीमोरगाव जि. गोंदिया.
मो. ९७६४६७६४९९ (कथाकार साहित्याचे अभ्यासक आहेत.)

यानंतर पेशवाईच्या अस्ताबरोबरच इंग्रजी भाषेच्या सत्तेत मराठी भाषेची संरचना काही प्रमाणात बदलली. इंग्रजांनी महाराष्ट्रात आपली सत्ता स्थापन केली. त्यामुळे इंग्रजी साहितच्या प्रभावामुळे मराठीत निबंध, कादंबरी, लघुकथा, शोकात्मिका असे अनेक नवे साहित्यप्रकार मराठीतून लिहिले जाऊ लागले. 'केशवसुत' हे या आधुनिक कवितेचे प्रवर्तक होते. आधुनिक कवितेमध्ये कवींच्या व्यक्तिमत्वाचा, त्यांचा भावनांचा आविष्कार दिसून येतो. कवीचे भोवतालच्या जीवनाशी असलेले संबंधही महत्त्वाचे ठरत असल्याने सामाजिक जाणिवेने मराठी कवितेला नवे वळण देण्याचे कार्य मर्ढेकरांच्या कवितेने १९४०-४५ च्या काळात केले. मानवी जीवनातील असंगतता, मूल्यांची पडझड, एकाकीपणा या कवितेतून व्यक्त होताना दिसतो. मराठी भाषेतील पद्य आणि गद्य साहित्य हे भाषेच्या शास्त्रशुद्ध व्याकरणामुळे साकार झाले. आधुनिक काळातील महात्मा फुले यांचा 'शेतकर्यांचा आसूड' हा ग्रंथ इंग्रजांच्या काळातील नवीन बदल दाखवतो. यामध्ये इंग्रजी सत्तेमुळे शेतकरंचे झालेले हाल, नवीन शैलीने रेखाटले आहे.

**मराठीतील भाषाशास्त्र व सौंदर्य**

अनेक साहित्यिकांनी मराठीत आपल्या साहित्याची भर घालून मराठी भाषा मराठी मनामनातून जागृत ठेवली. सामाजिकशास्त्रे, तत्त्वज्ञान, चित्रकला, साहित्य, संगीत, नाटक यासारख्या कलांचे समीक्षा-विचार मराठीत मूळ धरू लागले आहेत. तर एकीकडे इंग्रजीच्या वाढत्या वापरामुळे मूळ मराठी भाषा बदलत आहे. दैनंदिन बोलीभाषेतून मराठीचे संवर्धन करणे, मराठीचे सौंर्दय, खानदानीपणा टिकवून ठेवणे हे प्रत्येक मराठी भाषकाचे कर्तव्य आहे.

**मराठीतील बोली ठरते संस्कृतीची भाषा**

मराठी ज्या प्राकृत भाषेपासून निर्माण झाली त्यासाठी एक दीर्घ कालखंड गेला असणार. पाली, शौरसेनी, महाराष्ट्री, वगैरे प्राकृत भाषा समाजात मान्यता पावल्या म्हणजेच त्या भाषेतून ग्रंथ निर्मितीही झालेली आहे. आधुनिक भाषा निर्माण झाल्यावर प्राकृत भाषेतून (ग्रंथ निर्मिती इ.स. ११०० पर्यंत अनेक ग्रंथ निर्माण झाले असावेत. निरनिराळ्या प्राकृत भाषेपासूनच पुढे मराठी भाषेची निर्मिती झाली. शैरसेनी भाषा बोलणारा राष्ट्रीक समाज, मागधी व महाराष्ट्री बोलणारा वैराष्ट्रीक समाज आणि आभीर समाज महाराष्ट्रात आले त्यातूनच मराठी भाषा बोलली जाऊ लागली. उत्तरेकडील सातपुडा पर्वत रांगापासून ते कावेरीच्या पश्चिमेकडील प्रांतापर्यंत, उत्तरेस दमणपासून दक्षिणेकडे गोव्यापर्यंत मराठीचा विस्तार झाला. प्रामुख्याने भारताच्या दक्षिण भागात मराठी भाषा विकसित झाली. येथील सह्याद्री, सातपुडासारख्या डोंगररांगा, गड व किल्ले, दर्याखोर्यांचा परिसर मराठी भाषा फुलत गेली. यामुळे प्रत्येक काळात मराठी भाषेवर याचे परिणाम दिसून येतात. काळाप्रमाणेच स्थलानुसार मराठी भाषा बदलत गेली. त्यातूनच मुख्य मराठी, अहिराणी मराठी, मालवणी मराठी, वर्हाडी मराठी, कोल्हापुरी मराठी, मराठवाडी मराठी असे पोटप्रकार पडत गेले.

**मराठीचा अभिजात दर्जा**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा अर्थ हा आहे की, मराठी भाषा आता भारतातील त्या विशिष्ट भाषांच्या यादीत आली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. एक लढाई यशस्वी झाली. आपल्या मराठी भाषिकांसाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. ज्यांना त्यांच्या प्राचीन परंपरा, साहित्यिक श्रीमंती, आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे अभिजात भाषा म्हणून ओळखले जाते. अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी काही विशिष्ट निकष पूर्ण करावे लागतात. मराठीने हे सर्व निकष पूर्ण केले आणि म्हणूनच तिचा दर्जा अभिजात भाषांमध्ये समाविष्ट केला गेला.



# मुंबई नाशीक महामार्गावरील उंच गटार बांधकामामुळे शेतकरी त्रस्त : निवेदन देऊनही शुन्य कार्यवाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गावरील उंच गटार बांधकामामुळे स्थानिक शेतकरी त्रस्त झाले असुन निवेदन देऊनही कार्यवाही होत नसल्याने आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

कुंरूद येथील स्थानिक शेतकरी राजेश लहु पाटील यांची सर्वे नंबर ४६/३ ड ही शेतजमीन राष्ट्रीय महामार्ग ३ साठी संपादित करण्यात आली असुन त्यांचा अल्प मोबदला त्यांना मिळाला आहे. उर्वरित जमीनीवर शेतकरी पाटील यांनी उदरनिर्वाहासाठी पार्किंगचा व्यवसाय सुरू केला असुन महामार्गालगतच त्याच्या जागेसमोर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने रस्त्यापेक्षा उंच गटारीचे बांधकाम केल्याने व सध्या रस्त्याचे काम सुरू असुन तयार होणाऱ्या रस्त्याची उंचीही कमी असल्याने पाटील यांच्या पार्किंग जागेवर वजनदार गाड्या जाण्यासाठी व बाहेर पडण्यासाठी अडचण निर्माण झाली आहे. चढण व उतारामुळे वेळप्रसंगी अपघातही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब शेतकरी राजेश पाटील यांच्या लक्षात येताच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण नाशीक यांच्या कार्यालयात धाव घेऊन प्राधिकरण अधीकाऱ्यांनी पाहणी करुन गटारांची उंची कमी करून नवीन तयार होणाऱ्या रस्त्याच्या उंचीच्या बनवाव्यात अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे केली आहे. विस दिवस उलटूनही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा एकही अधिकारी पाहणी करण्यासाठी आला नसल्याने शेतकरी राजेश पाटील हवालदिल झाले आहेत. तर स्थानिक शेतकऱ्यांनी महामार्ग रुंदीकरणासाठी कवडीमोलाने जमीनी दील्या मात्र उर्वरीत राहीलेल्या जमीनीसमोर रस्त्यापेक्षा उचं गटारी बांधुन शेतकऱ्यांना नाहक त्रास देण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण करत असल्याचे स्थानीक शेतकरी राजेश लहु पाटील यांनी सांगितले.

# पंढरपूर शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार निवारण दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : नागरिकांशी थेट संवाद साधता यावा तसेच तक्रारींचा वेळीच निपटारा व्हावा यासाठी पंढरपूर शहर पोलीस स्टेशन येथे आज शनिवार दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २९ तक्रारदारांच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी दिली.

जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या निर्देशानुसार व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली दर शनिवारी तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे.




तक्रार निवारण दिनानिमित्त पंढरपूर शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक विश्वजीत

**२९ तक्रारींचे निवारण**

घोडके यांनी तक्रार अर्जा संबंधीत अर्जदारांना भेटून त्यांच्या तक्रारीबाबत चर्चा करुन अर्जदारांचे समाधान करुन तक्रारीचे निवारण केले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक मोनिका खडके, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर वगरे, सुनील पवार यांच्यासह संबंधित तक्रारदार उपस्थित होते.

यावेळी पोलीस निरीक्षक श्री घोडके म्हणाले, तक्रार निवारण दिनी तक्रार दाखल करण्यासह दाखल तक्रारींच्या कार्यवाहीची माहिती तक्रारदारास दिली जाणार आहे. समोर आलेल्या अर्जानुसार तडजोडी आणि समझोता प्रयत्नही केले जाणार आहेत. यादरम्यान अधिकाधिक तक्रारींचा निपटारा करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच तक्रार दिना निमित्त नागरिकांना आपल्या तक्रारी मांडता येतील असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# आंबेडकरी साहित्य ही समतेची चळवळ : डॉ. चंद्रशेखर भारती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : निसर्ग नियम हा आहे की अन्यायाची परिसीमा होते, तेव्हा विद्रोहाचा जन्म होतो. पिचलेला शोषित माणूस अन्यायाविरुद्ध पेटून उठला.




परिवर्तनशीलता, विज्ञाननिष्ठा, मानवांची गाणी गाणारी भूमिका ही आंबेडकरी साहित्याची वैशिष्ट्ये आहेत. आंबेडकरी साहित्य आणि वैश्विक कुटुंबाला विचारांच्या आधारावर व्यवस्था परिवर्तनाशी जोडले तो प्रश्न विचारू लागला. याचा परिपाक असा झाला की आंबेडकरी साहित्य अविष्कारले. लेखक त्यातून माणसाची संवेदना मांडू लागला. समताधिष्ठित समाज रचना घडविणे आणि समतेची चळवळ चालविणे हेच आंबेडकरी साहित्य होय असे प्रतिपादन चौथ्या आंबेडकरी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ चंद्रशेखर भारती यांनी केले.

प्रज्ञाबोधी साहित्य अकादमी आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, बुद्धभूमी फाउंडेशन, वालधुनी, कल्याणी येथे चौथे आंबेडकरी साहित्य संमेलन भरले होते. या संमेलनाचे उद्घाटक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने व प्रकाशन समितीचे सचिव डॉ. प्रदीप आगलावे होते. संमेलनाध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक निरंजन पाटील होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, ज्येष्ठ रिपब्लिकन नेते अण्णासाहेब रोकडे, ड. प्रकाश जगताप हे विचार मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी डीएमसीटी हॉस्पिटलचे डॉ. रविंद्र जाधव यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. संमेलनाध्यक्ष निरंजन पाटील म्हणाले की, नव्या प्रेरणा,नव्या जाणीवा, आणि एका नव्या पुनर्रचनेच्या परिघावर उभे केले. तर उद्घाटक डॉ. प्रदीप आगलावे म्हणाले की, आंबेडकरी तत्त्वज्ञान वैश्विक तत्त्वज्ञान आहे. आंबेडकरी साहित्य मनोरंजनाचे साहित्य नाही तर, प्रबोधनाचा विचार माणसाच्या मेंदूत पेरणार हे साहित्य आहे. माणसाला माणूसपण मिळवून देणार हे तत्त्वज्ञान आहे.

या साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक शिवा इंगोले, डी एल कांबळे, एन एस भालेराव, प्रा. आशालता कांबळे, कवी अरुण म्हात्रे, नवनाथ रणखांबे, गझलकार दत्ता जाधव, पाली भाषेचे विचारवंत अतुल भोसेकर, पत्रकार सुनील खोब्रागडे, डॉ. सुषमा बसवंत, प्रा. प्रेमरत्न चौकेकर, अरुण जावळे (सातारा) शाम भालेराव, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. ग्रीष्म खोब्रागडे, किसन वराडे, मिलिंद जाधव, अक्षय भोईर, सुभाष आढाव, अनिल भालेराव, भटू जगदेव, प्रमोद बाविस्कर, प्रा. जगदीश घनघाव, बुद्धराज गवळी, वैभव काळखैर, नवनाथ रणखांबे,उमेश गोटे, यशवंत बैसाणे, मनीषा मेश्राम, रविप्रकाश ठोंबरे, संघरत्न घनघाव आदी साहित्यिकांनी आपला सहभाग नोंदवला. या साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध कवियत्री शुभांगी भोसले यांनी केले. तर प्रास्ताविक व आभार साहित्यिक प्रा. युवराज मेश्राम यांनी केले.

# जनकल्याण मराठी पत्रकार संघाची बागलाण व देवळा तालुका कार्यकारिणी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जनकल्याण मराठी पत्रकार संघाची बागलाण तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असुन बागलाण तालुका अध्यक्ष पदी सचिन सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. काल सटाणा येथिल झालेल्या बैठकीत विविध पदाधिकारी यांची निवड करुन त्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.




कार्यकमाचा अध्यक्षस्थानी शिवसेनेचे अरविंद सोनवणे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वात्सल्य रुग्णालयाचे संचालक डॉ राहुल सोनवणे, जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष रफिक सैयद, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष देविदास बैरागी, राज्य प्रमुख सल्लागार अन्वर पठाण, महिला राज्य अध्यक्ष मनिषा पवार, अन्याय अत्याचार निवारण समिती च्या राज्य अध्यक्ष कल्याणी धोंडगे, पोलीस मित्र समिती चे राज्य अध्यक्ष आनंद दाणी, विश्वस्त गणेश खरोटे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष पदी मालेगाव येथील सतीश खैरनार यांची तर नासिक जिल्हा उपाध्यक्ष पदी चेतन दाणी यांची तर जिल्हा संघटक पदी गणेश बागुल यांची तसेच जिल्हा सचिव पदी शशिकांत पवार यांची तर देवळा येथील आदिनाथ ठाकूर यांची जिल्हा सह सचिव पदी नियुक्ती करण्यात येवून त्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

जनकल्याण मराठी पत्रकार संघ संचलीत आरोग्य निवारण समिती च्या राज्य अध्यक्ष पदी डॉ राहुल सोनवणे ,अन्याय अत्याचार निवारण समिती च्या राज्य उपाध्यक्ष पदी करुना पाटील ,पोलीस मित्र समिती च्या राज्य उपाध्यक्ष पदी मंगेश भामरे, यांची निवड करण्यात आली.

जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या बागलाण तालुका कार्याध्यक्ष पदी प्रशांत भामरे, तालुका सचिव पदी संदिप गांगुर्डे, तर जगदीश बधान यांची तालुका उपाध्यक्ष तसेच सुनिल वाघ यांची तालुका उपाध्यक्ष पदी तर बाळू बागुल यांची मुल्हेर विभाग प्रमुख तर राजेंद्र वानले यांची ठेंगोडा विभाग प्रमुख मणुन तर गणेश खरोटे यांची बागलाण तालुका उपाध्यक्ष पदी तर संभाजी सावंत यांची नामपुर शहर अध्यक्ष पदी तर सुनिल निंकुभ यांची शहर संघटक पदी तर अशोक शिंदे यांची साल्हेर विभाग प्रमुख तर निळकंठ जाधव यांची नासिक शहर संघटक पदी तर मनोज पिंगळे यांची सटाणा शहर अध्यक्ष पदी तर निळकंठ भालेराव यांची बागलाण तालुका उपाध्यक्ष पदी गोविंद ठाकरे यांची तालुका संघटक पदी एकमताने निवड करण्यात आली.

देवळा तालुका जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी महादू मोरे यांची तर तालुका उपाध्यक्ष पदी जितेंद्र आमले यांची नियुक्ती करण्यात आली. पोलीस मित्र समिती च्या बागलाण तालुका अध्यक्ष पदी किशोर म्हसदे यांची तर तालुका उपाध्यक्ष पदी दिपक जाधव यांची तर गणेश सावंत यांची तालुका उपाध्यक्ष पदी तर गणेश जाधव यांची तालुका उपाध्यक्ष पदी तर यांची निवड करुन नियुक्ती पत्र देण्यात आले. अन्याय अत्याचार निवारण समिती च्या बागलाण तालुका अध्यक्ष पदी वैशाली बिरारी यांची निवड करण्यात आली.

या वेळी जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष मच्छिंद्र साळुंके, दिंडोरी तालुका अध्यक्ष सुरेश सुरासे, पोलीस मित्र समिती चे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिनेश पगारे, उपाध्यक्ष गोरख सोनवणे वामन शिंदे, हरि भास्कर नासिक शहर कार्याध्यक्ष किरण घायदार यांच्या सह अनेक पत्रकार उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### कारच्या धडकेत दुचाकी वरील तरुणाचा मृत्यू ; दयानंद कॉलेज चौक येथील घटना

सोलापूर, (प्रतिनिधी) : कारच्या धडकेत दुचाकी वरील तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना २१ फेब्रुवारी रोजी दयानंद कॉलेज चौक येथे घडली.याप्रकरणी धोंडीबा नारायण कवडे (वय-५३,रा.कोटा नगर,जुना विडी घरकुल) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून विवेक विजयकुमार गिलडा (वय-३१-,रा.स्टेट बँक कॉलनी नंबर १ भवानी पेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.


याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचा मुलगा किरण कवळे (वय-१८) हा दुचाकी क्रमांक एम.एच.१३. डीएफ.२११२ यावरून प्रियंका चौकाकडून राहत्या घराकडे येत असताना विवेक याच्या ताब्यातील कार्यक्रमांक एम.एच.१४. एच.डब्ल्यू.३३४४ ही भरधाव वेगाने जात असताना फिर्यादी यांचा मुलगा रस्त्याच्या कडेला डाव्या बाजूने दुचाकीवरून येताना त्याच्याकडे दुर्लक्ष करून दुचाकीला धडक देऊन गंभीर जखमी होऊन मयत झाला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.

# आमदार बनकर यांच्या हस्ते पंचायत समिती निफाड येथे घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वितरण

## निफाड तालुक्यातील पाच हजार ८७६ मंजूर लाभार्थ्यांना मिळणार हक्काचे घर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : ग्रामीण भागासाठी प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र शासनाने सुरू केलेली महत्त्वकांक्षी योजना असून केंद्र शासनाच्या या महत्वकांक्षी योजनेच्या ग्रामीण टप्पा दोन मध्ये पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांनी महाराष्ट्रासाठी सुमारे वीस लाख घरकुलांचे उद्दिष्ट दिले आहे त्याप्रमाणे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी राज्यातील या वीस लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र देणे तसेच दहा लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता अनुदान वितरणाचा कार्यक्रम दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी तीन वाजता व्हिशीद्वारे प्रस्तावित केल्याची माहिती पंचायत समिती निफाडचे गटविकास अधिकारी तुकाराम जाधव सहाय्यक



गट विकास अधिकारी सुनील पाटील यांनी दिली असून निफाड तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत ५८७६ मंजूर लाभार्थ्यांना देशाचे गृहमंत्री आणि अमित शहा म हाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते ऑनलाईन लाईव्ह पहिला हप्ता वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण बघावयास मिळत असून प्रशासनाच्या वतीने पंचायत समिती निफाड येथे आयोजित करण्यात आलेल्या लाईव्ह कार्यक्रमात आमदार दिलीप बनकर हे उपस्थित होते.

उपस्थित घरकुल लाभार्थ्यांना त्यांचे हस्ते प्राथमिक स्वरूपात पाच लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वितरण करण्यात आले असून टप्पा दोन मधील लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्यात आला आहे, यावेळी तालुक्यातील विविध सरपंचांचा सत्कार करण्यात आला असून.

यावेळी गटविकास अधिकारी तुकाराम जाधव, सहाय्यक गट विकास अधिकारी सुनील पाटील, विस्तार अधिकारी राजेश थोरात, प्रशांत बोरसे, तसेच ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सदस्य,लोकप्रतिनिधी, सर्व खात्यातील अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

# श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी दोन लाख किंमतीच्या अन्नधान्य व इतर वस्तू अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस श्री दत्त आश्रम संस्थान जालना यांचेकडून दोन लाख १५ हजार किंमतीचे अन्नधान्य व इतर वस्तू प्राप्त झाल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



मंदिर समितीचे श्री संत तुकाराम भवन येथे अन्नछत्र असून, या अन्नछत्रास उपयोगी साहित्य म्हणजे स्टील बादली २४ नग, जर्मन पाट्या २४ नग, वगराळे २४ नग, भातवाढी २४ नग, स्टील टब १२ नग, जर्मन पातेले ६ नग, स्टील जार ६ नग, सतरंजी, स्टील टोप १२ नग, धान्याचे डबे ६ नग, प्लास्टीक बादल्या ६६ नग, प्लास्टीक मग २४ नग, गॅस शेगडी ५ नग, स्टीलचे जग ६ नग इत्यादी सुमारे १ लाख ८० हजार किंमतीचे साहित्य उपलब्ध करून दिले आहे. याशिवाय, १०० किलो साखर, १०० किलो गहू, १०० किलो तांदूळ, १०० किलो तुरीची दाळ, १०० किलो हरभरा दाळ व ४५ किलो खाद्यतेल इत्यादी सुमारे ३५ हजार किंमतीचा किराणा माल देखील उपलब्ध करून दिला आहे. यावेळी श्री दत्त आश्रम संस्थान जालना यांचे विश्वस्त, विभाग प्रमुख संजय कोकीळ व सहायक विभाग प्रमुख राजकुमार कुलकर्णी उपस्थित होते.

मंदिर समितीमार्फत भाविकांना श्री संत तुकाराम भवन येथे दुप-ारी १२.०० ते २.०० व सायंकाळी ७.०० ते ९.०० या वेळेत मोफत भोजन प्रसाद उपलब्ध करून देण्यात येतो. त्यामध्ये दैनंदिन ३००० ते ३५०० भाविक लाभ घेतात. या अन्नछत्रामध्ये अन्नदान करावयाचे असल्यास अन्नछत्र सहभाग योजना उपलब्ध असून, या योजनेत किमान ७ हजार पासून पूढे रक्कम दिल्यास, इच्छित दिवशी अन्नछत्रात अन्नदान करता येते. याशिवाय, अन्नधान्य व किराणा माल व इतर भेट वस्तू देखील स्विकारल्या जातात अशी माहिती यावेळी श्री श्रोत्री यांनी दिली.

# कार्यकाळ संपूनही खुर्ची सोडेना

## एन विभाग मनपा कार्यालयातील प्रकार; माहिती अधिकार कार्यकर्ते केतन भोज यांची अखेर मुख्यमंत्र्याकडे तक्रार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर, (प्रतिनिधी) : महापालिकेच्या एन विभाग कार्यालयातील घन कचरा व्यवस्थापन विभागातील सहाय्यक अभियंता सूर्यकांत सातपुते यांचा तीन वर्षाचा कालावधी संपला आहे.तरी देखील ते खुर्ची सोडायला तयार नाहीत.कायद्यानुसार ३ वर्षाचा कालावधी संपला तरी सदर अधिकाऱ्यांच्या बदल्या प्रशासन का करित नाही.असा संतप्त सवाल माहिती अधिकार कार्यकर्ते केतन भोज यांनी केला आहे.महापालिकेच्या एन विभाग कार्यालयातील घन कचरा व्यवस्थापन विभागातील सहाय्यक अभियंता म्हणून सूर्यकांत सातपुते २०१७ पासून रुजू झाले आहेत.तरी यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर वरिष्ठांचा व प्रशासनाचा अंकुश न राहिल्यामुळे अशा अधिकाऱ्याची अरेरावी आणि दांडगाई वाढलेली आहे.त्यांच्या मनमानी कारभारामुळे नागरिक प्रचंड त्रस्त आहेत. सलग ३ वर्षाचा कार्यकाळ



पूर्ण केलेला असताना मनपा प्रशासन यांना येवढी मोठी मुदतवाढ कशी देऊ शकते?आणि जर मुदतवाढ द्यायची नसेल तर त्यांच्या जागी नव्या अधिकाऱ्यांची तरी नियुक्ती करायला हवी.घन कचरा व्यवस्थापन, एन विभागातील सहाय्यक अभियंता सूर्यकांत सातपुते यांची बदली का होत नाही?असा प्रश्न भोज यांनी प्रशासनाला विच-ारला आहे.यांसारखे अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी ठाण मांडून बसले आहेत. तरी अशा अधिकाऱ्यांच्या कार्यकाळची व कामकाजाची चौकशी करून लवकरात लवकर बदली करावी. अशी मागणी केतन भोज यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव, महापालिका मुख्य आयुक्त तथा प्रशासक, राज्याचे मुख्य सचिव,उपलोक आयुक्त तसेच सहाय्यक आयुक्त एन विभाग यांच्याकडे केली आहे.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे करजगी येथे आजपासून राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद सम ाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित मात-ोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे निवासी विशेष श्रम संस्कार शिबिर सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी ते रविवार २ मार्च अखेर होणार आहे.

सोमवारी रोजी दुपारी चार वाजता आम दार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते शिबिराचे उद्घाटन होणार असून याप्रसंगी पो-लीस निरीक्षक महेश स्वामी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत तर सरपंच विवेकानंद उंबरजे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

शिबिरामध्ये शोष खड्डे, पाझर खड्डे, बालविवाह रोखणे, किशोरवयीन मुला मुलींचे निमिया तपासणे आदी कार्यक्रम होणार आ-हेत. याशिवाय प्रख्यात डॉक्टर ओंकार कत्ते, उद्योजिका सौ रुपाली कणमुसे, सोलापूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इश-ाधिंन शेळकंदे, कीर्तनकार विठ्ठल माने आदींचे दररोज दुपारी पाच वाजता व्याख्यान होणार आहे याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रम देखील होणार आहेत. याप्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसूती, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सीईओ रूपाली शहा, प्राचार्य डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी आदी म ान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिबिराचा समारोप रविवार दि २ मार्च रोजी सकाळी ११ वाजता होणार असून यावेळी विद्यापीठाचे संचालक डॉ राजेंद्र वडजे, बसवेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दयानंद उंबरजे, मल्लिनाथ कल्याणशेट्टी, जिल्हा समन्वयक डॉ वीरभद्र दंडे, विभागीय प्रमुख डॉ धनंजय मोगले उपस्थित राहणार आहेत.

**आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी करणार शिबिराचे उद्घाटन..**

तरी मान्यवरांनी शिबिरातील सर्व प्रबोधन कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, कार्यक्रमाधिकारी प्रा. राजशेखर पवार त्यांनी केले आहे.

# महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व रुजवायला हवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर. मध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी रणभूमी क्रीडा महोत्सव अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य. डॉ. बी.एस.नाईकनवरे यांनी महाविद्यालयातील मुलांम ध्ये शारीरिक शिक्षणाचे महत्त्व वाढवायला हवे असे वक्तव्य केले. यादरम्यान बोलत असताना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दररोज किमान ६० मिनिटे शारीरिक हालचाली करणे आवश्यक आहे. व बहुतेक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आवश्यक अस-लेली शारीरिक हालचाल मिळत नाही. महाविद्यालयातील विद्या-र्थी हे शारीरिक दृष्ट्या सक्रिय राहण्याऐवजी त्यांचा बहुतांश वेळ बैठे जीवनशैलीत व मोबाईल पाहण्यात जातो. यादरम्यान त्यांनी काही संशोधनातून पुढे आलेले आकडे विद्यार्थ्यांसमोर मांडले यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी दररोज सरासरी ५ ते ६ तास स्क्रीन समोर घालवतात व वाढत्या बैठीशैलीमुळे मुलांच्या मध्ये लठ्ठपणा ,मधुमेह यासारख्या आरोग्य समस्या वाढत आहेत याचे स्पष्टीकरण दिले. व या समस्या पासून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेशी झोप ,योग्य आहार, योग, व



दररोज व्यायाम याचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमा च्या उद्घाटन सोहळ्यात महाविद्यालयाचे उपप्रा-चार्य डॉ. तुकाराम अनंतकळस, डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत. डॉ.अनिल चोपडे, व जिमखाना विभागाचे सर्व सदस्य महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख प्राध्यापक वर्ग व कर्मचारी हे उपस्थित हो-ते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका डॉ. बी.के.सुडके यांनी केले. या रणभूमी क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी मैदानी स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा, कॅरम स्पर्धा, व सांघिक खेळामध्ये खोखो, कबड्डी, रस्सीखेच, क्रिकेट, व्हॉलीबॉल, अशा विविध खेळाचे आयोजन जिमखाना विभाग मधील प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले व जिमखाना कमिटी तर्फे करण्यात आले.

**शिव-बसव-राणा व काशिबा महाराज जन्मोत्सव मंडळाच्या वतीने शिवसप्ताहाचे आयोजन**

**प्रेरणा या विषयावर व्याख्यान**

# रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवचरित्र हे माणसाला सर्वांग सुंदर जिवन जगण्याला प्रेरणा देते : भैरवनाथ कानडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : मातृभूमीची परकीय अमलापासून म ुक्तता,म्हणजेच हिंदवी स्वराज्याची स्थ-ापना हे शिवछत्रपतींचे जीवनकार्य होते. या कार्यासाठी त्यांनी अविरत कष्ट घेत-ले. स्वराज्याच्या उभारणीबरोबर त्यांनी त्यांचे अत्यंत कार्यक्षम व लोकाभिमुख असे प्रशासन निर्माण केले. त्यांची कामगिरी त्यांच्या लष्करी पराक्रमांइतकीच महत्त्वाची आहे. सामान्य म ाणसाचे,गोरगरीब रयतेचे कल्याण व संरक्षण हे त्यांच्या प्रशासनाचे मुख्य सूत्र असल्याने लोककल्याणकारी राजे म्हणून जगभरात त्यांची प्रतिमा निर्माण झाली.मराठयांचे एकीकरण करून त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याची अभिलाषा उत्पन्न करणे, याशिवाय समाजात राष्ट्रीयत्वाची भावना जोपासणे याचा संदेश आपणास शिवचरित्रातून मिळतो.तेव्हा शिवप्रभुंच्या विचार कार्यावरच आमच्या राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असून शिवचरित्र हे आमच्या सर्वांग सुंदर जगण्याची प्रेरणा आहे. असे मत महाराष्ट्र शासन राज्य शिक्षक पुरस्कार विजेते तथा प्रेरणादायी वक्ते भैरवनाथ कानडे यांनी व्यक्त केले .

तुळजापूर तालुक्यातील वागद-री येथे शिव-बसव-राणा व काशिबा महाराज जन्मोत्सव मंडळ वागदरीच्या वतीने आयोजित शिवसप्ताहाच्या प्रसंगी' शिवचरित्र जगण्याची प्रेरणा या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ कार्यकर्ते भालचंद्र यादव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.गणेश बिराजदार,तंटा मुक्त अध्यक्ष तथा माजी सरपंच राजकुम ार पवार आदी होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, महार-ाणा प्रतापसिंग,व संत काशिबा महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करू आभिवादन करन्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्र संचलन अँड. अमोल पाटील यानी केले.

या वेळी जेष्ठ कार्यकर्ते फतेसिंग भाई ठाकूर, माजी उपसरपंच दत्ता सुरवसे,उत्तम झेंडारे, रिपाइं (आठवले) जिल्हा सम न्वयक एस.के. गायकवाड,नामदेव यादव, पांडू बिराजदार, जन्मोत्सव मंडळाचे प्रमोद बिराजदार,श्रीकार धुमाळ भगतसिंग ठाकूर, सह ग्रामस्था,महिला, यूवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुपतगाव येथे शिवजयंती निमित्त ३१ दात्यांचे रक्तदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिवछत्रपती प्रतिष्ठान येथे आयोजित केलेल्या शिबिरात युवकांनी व महिलांनी रक्तदान केले, यावेळी ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन उमरगा लोहारा तालुक्याचे आम दार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिलीप भालेराव, चंद्रकांत हेंडले, काशिनाथ करके, रतन लाम जने, अप्पराव मुळे, मल्लिनाथ मातोळे, मोहन गुरव यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

हे रक्तदान शिबिर समाजा-तील लोकांच्या जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमि त्त अशी सामाजिक उपक्रम आयोजन करण्यामुळे त्यांचा आदर्श नवा युवक वर्ग पुढे आणतो. या शिबिरात युवक, तसेच ५ महिलांनी स्वफ ुर्तीने रक्तदान केले.

रक्त संकलन श्रीकृष्ण ब्लड सेंटर उमरगा येथील विजय केवडकर, किशोर खरोसे,राम चव्हाण,ऋतिक म्हेत्रे यांनी ब्लड कॅम्प साठी ब्लड बँकेतर्फ हजेरी लावली. रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देण्यात आली.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गुलचंद मातोळे, गोपाळ पाटील, सचिव महादेव भोईटे, खजिनदार कालिदास भुजबळ, पुरुष-ोत्तम मुळे, भालचंद्र मातोळे, सिद्धेश्वर माने, विष्णु शिंदे, राम मुळे, गणेश मुळे, बळी भोईटे, सतीश मुळे, ज्ञानेश्वर भुजबळ, नवनाथ शिंदे, गहीनाथ शिंदे, ओमकार मातोळे यांच्यासह सर्व सदस्यांनी, शिवभक्तांनी परिश्रम घेतले.

# विक्रम गायकवाड खून प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा करावी : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## संशयितांची नार्को टेस्ट करावी; नियुक्त एसआयटीमध्ये आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी/भोर : उत्रोली ता. भोर.येथील विक्रम गायकवाड या बौद्ध युवकाने मराठा तरुणीशी विवाह केल्याच्या रागातून ऑनरकिलिंगचा बळी ठरलेल्या बौद्ध तरुण दिवंगत विक्रम गायकवाड यांच्या हत्याप्रकरणी केवळ एक आरोपी अटक करण्यात आला असून एक व्यक्ती हा गुन्हा करू शकत नाही. त्यामुळे या गुन्ह्यात विक्रम गायकवाड च्या कुटुंबियांनी संशयित आरोपी म्हणून ज्यांची नावे जबाबात दिली आहेत त्यांची नार्को टेस्ट करावी अशी मागणी पुढे आली आहे. त्यामुळे या प्रकरणातील संशयित आरोपींची नार्को टेस्ट करण्यात यावी ,तसेच याप्रकरणी नियुक्त करण्यात आलेली एस आय टी सक्षम नसून या एस आय टी मध्ये आय पी एस दर्जाचा अधिकाऱ्याची नियुक्त करावी अशी मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केली आहे.



भोर तालुक्यातील उत्रोली या गावातील दिवंगत विक्रम गायकवाड यांच्या घरी भेट देऊन शोकाकुल गायकवाड कुटुंबियांची ना.रामदास आठवले यांनी सांत्वनपर भेट घेतली.दिवंगत विक्रम गायकवाड यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

यावेळी दिवंगत विक्रम गायकवाड यांचे आई वडील; चुलता बहीण सर्व कुटुंबिया उपस्थित होते.

विक्रम गायकवाड च्या सर्व मारेकऱ्यांना अटक करून त्यांना कठोरात कठोर फाशीची शिक्षा करावी अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली आहे.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे सुरेश बार्शिंग, परशुराम वाडेकर श्रीकांत कदम, शैलेश चव्हाण, महिपाल वाघमारे, उमेश कांबळे, प्रवीण ओव्हाळ, स्वप्निल गायकवाड, बळीराम सोनवणे आदी अनेक रिपब्लिकन कार्यकर्ते उपस्थित होते.

उच्चशिक्षित बौद्ध तरुण विक्रम गायकवाड यांच्यावर २२ वार करून अत्यंत निर्घुण हत्या करण्यात आल्याची निषेधार्थ घटना ८ फेब्रुवारी रोजी घडली.या प्रकरणी कर्तव्यात कसूर केलेले स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे. राज्यात पुन्हा अशी ऑनररकिलिंग ची घटना घडू नये याची काळजी घेऊन विक्रम गायकवाड हत्या प्रकरणी सखोल चौकशी करून सर्व मारेकऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा करावी अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी केली आहे. याप्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे ही रामदास आठवले यांनी सांगितले,

## थोडक्यात...

### मामाशी भांडण झाल्याचा राग मनात धरून मारहाण ; सात जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) मामाशी भांडण झाल्याचा राग मनात धरून शिवीगाळ




करत लाथा बुक्क्यांनी मारहाण करत, जातीवाचक शिवीगाळ करून सगळ्यांना कापून विहिरीत टाकतो असे म्हणून अपमान केल्याची फिर्याद आदित्य संतोष कांबळे (वय-२०,रा.नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दशरथ पुणेवाले, मुकेश चौधरी, कृष्णा पुणेवाले, राहुल चौधरी, रोहन चौधरी, गोपी पुणेवाले, अजय चौधरी (रा.शिवगंगा नगर,पारशी विहीर जवळ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २१ फेब्रुवारी रोजी घडली.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त पोमण - विभाग १ हे करित आहे.



# दुधनी केंद्रावर दहावीच्या परीक्षेस उत्साहाने सुरुवात

## कापीमुक्त वातावरणासाठी भरारी पथके उपस्थित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : सकाळी नवू वाजल्यापासून पाल्यासा परीक्षा केंद्र वर नेण्याची घाई.. परीक्षा केंद्रवार झालेल्या तोप गर्दी कडक बंदोबस्त विद्यार्थीच्या चेरावर्थी असलेल्या तणा अशा वातावरण मद्ये दुधनी केंद्रवार इयत्ता दहावीच्या परीक्षाला उत्साहत प्रारंब झाल पहिला दिवशी सुमारे ३९५ विद्यार्थत्यांनी परीक्षा दिली.

दहावीच्या परीक्षेला शुक्रवार पासून प्रारंभ झालेने पालकांने सुटकेचा नि :श्वासस सोडला आहे प्रशासननेही दहावीच्या परीक्षा साठी तयारी पूर्ण केली आहे. या परीक्षासाठी मातोश्री लक्ष्मीबाई सतलिंगप्पा म्हेत्रे प्रशाला दुधनी केंद्र क्रं ३२१०.

एकूण परीक्षाच्या विद्यार्थी ३९५.एकूण गैरहजर विद्यार्थी १५.एकूण हजार विद्यार्थी ३८० परीक्षा देत आहेत पाहिलं दिवशी मराठी, कन्नड, उर्दू पेपर शांततेत व सुरळीत पार पडला. विशेष म्हणजे यावर्षी सर्व परीक्षा केंद्रवार सी सी टीव्ही आणी पर्यवेक्षक साठी झूम मिटिंगद्वारे नजर टेवण्यात आली आहे यावेळी केंद्र चालक सुनील आडवीतोटे सर उपकेंद्र संचालक रामचंद्र गद्दी सर बैठकी पथक तुकाराम जावीर सर सहित प्रशालेचे बसवराज हिरतोटे सर परमशेट्टी शाळेचे मुक्याध्यपाक आलोगावे सर, माळी सर,लावणे सर, पाटणशेट्टी सर, हिळी सर, मोसंलगी सर, खराडे सर, बांद्राड सर, गोगांव सर, स्थवारमाठा सर, रुद्देवाडी प्रशालेचे करवीर मॅडम पावली मॅडम, कलबुर्गी मॅडम, प्रशालेचे वरिष्ट लिपिका पाटील सर



कानिस्ट लिपिका खेडा सर लोड्डेन सर, चिंचोली सर,शिपायी सांगण पावली,अशोक धोडमनी,सिद्धारम पाटील,गणपती गोटे, आदिनी परिश्रम घेतले आहे यावेळी बंदोबस्त साठी पोलीस कर्मचारी कोळी, जेवर्गी आदी चोक बंडबास्त साठी उपस्तित होते.

# शेतकरी पुत्र सतत ८ दिवस दिली शेतकऱ्यांना मोफत सेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : गजानन तोरमल ने शेतकऱ्यांना मदतीचा हात म्हणून एक उपक्रम चालु केला होता.

हा उपक्रम शेतकर्यांचा रब्बी हंगामातील तोंडी आलेला घास म्हनजेच शेतमाल. आता याचं शेतमालावर

## रविकांत तुपकर यांनी भेटून दिली शाब्बासकीची थाप

कीतीतरी खर्च होत असतो. शेतीची मशागत, बीयाने, औशदी, पेरनी, खते, मजुर, नंतर मशीन च्या सहाय्याने मळनी करने, नंतर ट्रॅक्टर ने शेतमाल घरी नेणे, पेरणी पासुन ते काढणी पर्यंत असा बराच खर्च हा शेतमाल घरात येण्या अगोदरचं शेतकरी राजा खीश्यातुन खर्च करतो उत्पन्न जेव्हडे तेव्हडाचं खर्च शेतमाल घरात एन्या अगोदरचं कराव लागत आहे. त्यासाठी शक्य होईल तेव्हडा मदतीचा एक हात म्हणून गजानन तोरमल यांच्याकडून गावच्या बळीराजा ला मदत दिली आहे.

दि ११/०२/२०२५ ते १८/०२/२०२५ पर्यंत शेतकर्यांची सेवा म्हणून ट्रॅक्टर ने अगदि मोफत शेतमाल शेतातुन घरी आणणे, असे आठ दिवसीय छोटासा उपक्रम राबवला.

गेल्या आठ दिवसामधे २४तास सेवा दिली सकाळी ५वाजेपासून ते रात्री १२ वाजेपर्यंत गावातील शेतकर्यांसाठी विना मूल्य एक रुपया सुध्दा न घेता. डीझल, ड्रायव्हर चा खर्च स्वतः खीश्यातुन पुरवीला हा उपक्रम चालु असतांना शेतकरी नेते रविकांत भाऊ तुपकर व विनायक सरनाईक यांच्या पर्यंत बातमी कळताच यांनि. कौतुक करन्यासाठी गावामध्ये येऊन शाल देउन सत्कार केला. शाब्बासकी देउन पाठ थोपटली आनी म्हनाले शेतकऱ्यांसाठी ग्राउंड लेवल वर लढला तुझे मनःपुर्वक अभिनंदन!

त्या वेळी टाकारखेड मु. माजी सरपंच भागवत खेंन्ते अमोल थोरात, मधुकर देशमाने, प्रतिष्ठित नागरिक हजर होते होते.

गावातील संपुर्ण शेतकरी वर्ग खुश आहे ज्या शेतकऱ्यांनी उपक्रमा मधे लाभ घेउन सेवेची संधी दिली त्यांच्या चेहर्यावर मला तरी स्मीत हास्य दिसले माझ्या कडु होईल तेव्हडी मी मदत गावच्या शेतकऱ्यांना केली..गजानन तोरमल


# वडनेर भैरव येथे भैरवनाथ महाराज व जोगेश्वरी मातेस द्राक्ष हार अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा द्राक्ष शेतीसाठी प्रसिद्ध असून, येथील शेती संपूर्ण राज्य आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाची भूमिका बजावते. कृषी संस्कृती टिकवण्यासाठी शेतीशी निगडित परंपरा आणि श्रद्धा महत्त्वाच्या असतात, त्यामुळेच शेतीला धार्मिक आणि आध्यात्मिक आधार मिळतो. चांदवड तालुक्यातील वडनेर भैरव गाव हे भैरवनाथ महाराजांच्या मंदिरामुळे प्रसिद्ध असुन भैरवनाथ महाराज हे भक्तांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे .दरवर्षी येथे मोठ्या भक्तिभावाने पूजा आणि विधी पार पडतात..यंदा भैरवनाथ महाराज व जोगेश्वरी माता यांना द्राक्ष हार अर्पण करण्याचा विधी पार पडला. जिल्हा अध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेशकुमार सलादे यांनी सपत्नीक भक्तिभावाने अर्पण केला. नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष शेती संपूर्ण देशभर प्रसिद्ध असून, येथून मोठ्या प्रमाणात द्राक्षांची निर्यात होते. येथील सुपीक माती व हवामान द्राक्ष शेतीसाठी अनुकूल असल्याने अनेक शेतकरी द्राक्ष शेती करतात. शेतीच्या या प्रगत स्वरूपामुळे गावाचा आर्थिक विकास झालाअसून, गावाची ओळख राष्ट्रीय स्तरावर आहे.





# एकनाथ हिरक आरोग्यवर्ष अंतर्गत शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ च्या वतीने शिवधर्म सेवा संघ व वेदांत हॉस्पिटल आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज ; राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त एकनाथ हिरक आरोग्यवर्ष अंतर्गत शिवसेना प्रभाग क्रमांक १२३च्या माजी नगरसेविका डॉ.भारती सुबोध बावदाने व शिवसेना विधानसभा प्रमुख डॉ.सुबोध बावदाने आयोजित शिवधर्म सेवा संघ व वेदांत हॉस्पिटल यांच्या वतीने खंडोबा टेकडी याठिकाणी मोफत रक्त तपासणी,आरोग्य तपासणी,हृदयरोग तपासणी,नेत्र तपासणी व मोफत औषध उपचार तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिराचा विभागातील स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला.यावेळी हे शिबिर यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी शिवसेनेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कठोर परिश्रम घेतले.तसेच शिवधर्म सेवा संघ व वेदांत हॉस्पिटल यांच्याही सर्व वरिष्ठ डॉक्टर व त्यांच्या टिमचे या शिबिराला मोलाचे सहकार्य लाभले असून आयोजक डॉ.भारती बावदाने व डॉ.सुबोध बावदाने यांनी सर्व डॉक्टर व त्यांच्या टिमचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

## शेतकरी योद्धा कृती समितीने दिला इशारा

## योद्धा कृती समितीच्या वतीने प्रशासनास दिले निवेदन

# एक तर शेतीला पाणी द्या नाहीतर पाण्यासाठी शेतकऱ्याचा बळी घ्या; आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : पळसखेड चक्का, तालुका सिंदखेड राजा येथील ३० वर्षांपूर्वी जिल्हा परिषद सिंचन विभाग यांच्या अंतर्गत पाझर तलावासाठी जमीन भूसंपादन केली असून संबंधित शेतकऱ्यांना त्याचा मोबदला सुद्धा मिळाला आहे आणि त्यांच्या ७ / १२ वर सुद्धा त्याची नोंद आहे.

तरीसुद्धा संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे हलगर्जीपणामुळे पळसखेड चक्का येथील ३० वर्षापासून तलाव प्रलंबित आहे . हा तलाव जर त्या ठिकाणी झाला तर गावातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटेल तसेच संपूर्ण शेतकऱ्याची जमीन सिंचनाखाली येईल व उगला, पिंपळगाव लेंडी, उंबरद, येथील शेतकऱ्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात फायदा होईल




या करीता हा तलाव अतिशय महत्त्वाचा आहे आणि लवकरात लवकर करण्यात यावा याकरिता गेल्या अनेक वर्षापासून आम्ही याचा पाठपुरावा करत आहे . आमच्या या लढ्याला अद्याप यश आले नाही. या अगोदर आम्ही संबंधित विभागाला बऱ्याच वेळेस विनंती केली पण आम्हाला उडवा उडवी चे उत्तर देण्यात आले तसेच त्यावेळेसचे लोकप्रतिनिधी यांनी फक्त आश्वासन दिले पण अद्याप काम झाले नाही. म्हणून

शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने आंदोलनाचा इशारा दिला असून संबंधित विभागाला उपविभागीय कार्यालय सिंदखेडराजा ( क ऊ ज ) यांच्यामार्फत निवेदन दिले असून तसेच सिंदखेड राजा मतदारसंघाचे आमदार श्री मनोज भाऊ कायदे आणि माजी आमदार डॉक्टर श्री शशिकांत खेडेकर साहेब यांनासुद्धा निवेदन देऊन विनंती सविस्तर चर्चा करण्यात आली .पळसखेड चक्का येथील

शेतकऱ्याच्या मागण्या आपण सरकार पुढे मांडावे आणि आम्हाला न्याय मिळून देण्यात यावा तसेच जिल्हा परिषद सिंचन विभागाने ३१ मार्च पर्यंत तलावाच्या संदर्भामध्ये वरिष्ठ विभागाला पाठपुरावा करण्यात यावा नाहीतर ३१ मार्च नंतर तलावा संबंधित विभागाने कुठलीच कारवाई केली नाही तर येणाऱ्या दिनांक १ एप्रिल पासून ज्या ठिकाणी हा पाझर तलाव होणार आहे. आणि ज्या ठिकाणी या पाझर तलावाची भिंत होणार आहे त्या ठिकाणी शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने अन्नत्याग आमरण उपोषण करण्यात येईल.

याची सर्वशी जबाबदारी संबंधित विभागाची असेल अशी माहिती शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने देण्यात आली.

# सावरकर विद्यालयाचे गांधी रिसर्च परीक्षेत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मविप्र सांचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथील इ. सातवी ची विद्यार्थ्यांनी प्राची प्रभाकर मोगल हिने गांधी रिसर्च फाउंडेशन,जळगाव आयोजित गांधी संस्कार परीक्षेत जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळवला.असुन विद्यालयाचा या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला आहे तिच्या या यशाबद्दल तिचे मविप्र सभापती बाळासाहेब आप्पा शिरसागर, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य प्रकाश टरले, सुयोग गीते ,तुषार मोगल व इतर मान्यवरांनी अभिनंदन केले. तिला विद्यालयातील हिंदी विषय शिक्षक किरण भडांगे व माधवराव गाडे यांचे मार्गदर्शन लाभले.